**विशेष दिवाणी दावा क्र. १७७/२०२५ मधील निशाणी २६ वरील आदेश.**

(कुंडलिक खोत वि. प्रकाश विरपन्ना चांभार कांबळे वगैरे)

**(CNR No-MHSN02-001138-2025)**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा हुकूम रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. प्रस्तुत कामात प्रतिवादी यांना दिनांक ०८/०८/२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. सदर कामातील प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक ०१/०४/२०२४ पासुन वैद्यकीय उपचार चालु आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांना गँगरीन झाल्याने व प्रतिवादी यांना चालता फिरता येत नसल्याने त्यांना वकील नेमुन सदर दाव्यास कैफियत देणे शक्य झालेले नाही. आजही प्रस्तुत प्रतिवादीस कोर्टात येण्यास शक्य नव्हते परंतु प्रतिवादी हे व्हील चेअर वरुन त्यांनी सदर अर्जावर व कैफियतीवर तसेच प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या आहेत. सदरचा विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रस्तुत प्रतिवादींची प्रकृती थोडीशी सुधारताच प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिला आहे व त्याबाबत डॉक्टरांचा अहवाल ही सदर कामी हजर केला आहे. प्रतिवादी यांनी सदरच्या दाव्यात हजर राहण्यास जाणुन बुजून उशीर केलेला नाही व सदर कामा जाणुनबुजून वकीलांमार्फत हजर राहिलेले नाहीत असे घडले नाही. या व इतर कारणांवरुन प्रतिवादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी क्रमांक ३२ कडे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. अर्जात नमुद कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे या कामी संगणमताने सदरचे कामकाज चालविणेस टाळाटाळ करत आहेत. या व इतर कारणांवरुन प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी वादी यांनी विनंती केली. जर न्यायालय अर्ज मंजुर करण्याच्या निष्कर्षाप्रत आल्यास

प्रतिवादींना दंड आकारण्याची तसेच सदरची रक्कम वादींना देण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स बजावणी होऊन ते दाव्याकामी हजर झाले नाहीत व कैफियत दाखल केली नाही. वादी यांनी प्रस्तुतचा दावा करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता तसेच निरंतर मनाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. तसेच, दावा गुणदोषावर चालून वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून कैफीयत नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे कैफियत दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. असे असताना, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांचेवर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **आदेश** ::

१. अर्ज नि.२६ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी क्र. १ यांनी वादींना रक्कम रु.५००/– द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.03.12 18:00:35 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ११/०३/२०२६ सह–दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.